ती. दादामामा / बाबा / आजोबा / सल्लागार /
आधुनिक-कुटुंबप्रमुख / हितचिंतक / मित्रास .....

(माणूस खूप जवळचा असला, की 'एकेरी' होतं संबोधन)

तू गेलास ......
सार्‍या तुझ्या खुणा
अवतीभवती विखुरलेल्या घरात !
तू गेलास .....
मंदारूपी सोनचाफा
सोनेरी सुगंध येई क्षणा-क्षणात !
तू गेलास .....
आठवणींनी उमाळा
मोठ्याथोरल्या विस्तारित कुटुंबात !
तू गेलास ......
सफल कृतार्थतेचा
मुक्काम पुढचा सुखसमाधानात !
तू गेलास .....
आदर्श यशोकर्तृत्वाचा
पिढ्यांसाठी मापदंड आयुष्यात !
तू गेलास .....
कित्येकविध जाणीवा
असंख्य लोकांच्या मनां-मनांत !

तू अजूनही आहेस .....
हात पुढे मदतीचा
सहज सल्ला योग्य जगण्यात !

तू अजूनही आहेस .....
सावरून कित्तीजणांना
हृदयी ह्या तेवणाऱ्या प्रकाशात !!
अखंडशा प्रकाशात !!

-स्वाती सिंह
६ मे २०२४